# कमतरता

देहात होता तिच्या रतीचा भास
अन बांध्यात रंभेचा उन्माद
चालीत हंसाचा डौल होता
कांतीला झळाळी अमर्याद

ओठात अमृताचे घट होते
नजरेत तिच्या मदिरेचे प्याले
वदनी कुंदकळ्या होत्या अन
गाली कश्मीरी गुलाब ओले

पापण्यांत जुईचे मार्दव होते
केसांत कृष्णमेघांची दाटी फार
बोटे तिची जणु चवळीच्या शेंगा
नासिकेवर तलवारीची धार

सर्वांगास घायाळ करणाऱ्या
बालेत या एकच कमी होती
सौंदर्याची खाणच अशी युवती
ती अस्तित्वातच नव्हती !

By: Abhay B. Joshi